# राजकारण्यांपासून डीएसकेंपर्यंत सगळे बदमाश खाजगी रुग्णालयात अन् गरीब पालिकेत सडणार?

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

पुण्याचे बिल्डर डी. एस. कुलकर्णी मुक्त होते तोपर्यंत कोट, टाय घालून मिजाशीत फिरत होते. त्यांना बेड्या पडल्यावर मात्र त्यांच्यात शाहरुख खान संचारला. म्हणजे कोट्यवधी संपत्तीची लूट करून श्रीमंतीच्या गप्पा मारणारे कचाट्यात सापडले की जे करतात, ते डीएसकेंनी केले. या सर्वांचा अभिनय इतका भारी असतो की, अमिताभ बच्चन, शाहरुख खान आणि सेटिंग करणाऱ्या आपल्या क्रिकेटपटूंचा अभिनय चिल्लर वाटतो. अशा या गुंडपुंड प्रवृत्तीच्या गुन्हेगारांना अटक झाली की कोठडीत पाऊल ठेवताच त्यांची प्रकृती बिघडते. मग कोठडीतून त्यांना पालिका रुग्णालयात नेले की त्यांचा आजार आणखी बळावतो. तिथून त्यांना थेट मस्त अशा गारगार छानछान खाजगी रुग्णालयात दाखल केले जाते आणि त्याच क्षणी त्यांची प्रकृती एकदम स्थिर होते. हे सगळं कोर्टाने कोठडी सुनावल्यानंतर एक दोन तासांत घडते. पत्रकार जेव्हा त्यांच्या तोंडावर कॅमेरा धरतात तेव्हा गडी जणू बेशुद्ध वाटतो आणि खाजगी रुग्णालयात स्पेशल वॉर्डमध्ये कॅमेऱ्यापासून दूर झाल्यावर हा बेशुद्ध गडी चालायला लागतो. हे सर्व इतके वेगाने घडते की, जणू 'गतिमान महाराष्ट्र'ची पाटीच लावावी. तुम्हा आम्हाला ओपीडीच्या रांगेत कागद काढायला वेळ लागतो, त्यापेक्षा कमी वेळात ही लोकं न्यायालय ते पालिका रुग्णालय आणि पालिका रुग्णालय ते खाजगी रुग्णालय इतका प्रवास पूर्ण करतात.

छगन भुजबळ खाजगी रुग्णालयात मस्त फिरत होते. हे जेव्हा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी सीसीटीव्हीचे चित्रीकरण मिळवून दाखविले तेव्हा या सर्व गोष्टींचा अंदाज असूनही सर्वांना धक्काच बसला. पैसा चालतो आणि पैसा भगवान से कम नहीं ही परिस्थिती सर्वांना माहिती आहे. पण पैसा किती चालतो ते समोरच दिसलं की अक्षरशः झोप उडते. ज्यांना ही चैन मिळवून दिली जाते ती काही साधी माणसं नाहीत. हे सर्व जण आरोपी आहेत, दोषी आहेत, त्यांनी गंभीर गुन्हे केले आहेत. त्यांनी लोकांना लुबाडलंय, त्यांनी सरकारला फसवलंय, ते गुन्ह्यांत सहभागी आहेत, त्यांनी हत्या केली आहे, त्यांनी खून केला आहे अशी ही माणसे आहेत. त्यांना खरे तर पालिका रुग्णालयांच्या जनरल वॉर्डमध्ये जमिनीवर झोपवले पाहिजे. प्रामाणिकपणे आयुष्य जगणाऱ्या गरिबाला पालिका रुग्णालयात कॉट मिळत नाही. तो तिथे जमिनीवर झोपतो आणि त्याचे नातेवाईक बाहेर फूटपाथवर झोपतात. या गुंड सोम्यागोम्यांना मात्र थेट पालिका रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात जागा मिळते, लगेच डॉक्टर येतात, तपासण्या होतात आणि हे शहाणे खाजगी रुग्णालयात काही तासांत पोचतात. हा प्रवास गरिबाने करायचा तर चार महिने लागतात. एक्स-रे काढायचा तर दोन दिवस रांगेत उभे राहायचे, चार दिवसांनी रिपोर्ट घ्यायचा, एमआरआय काढायचा तर एक महिन्यानंतरची तारीख मिळते. गरीब रुग्ण सकाळी रुग्णालयात दाखल झाला तर डॉक्टर संध्याकाळी तपासायला येतो आणि उपचार दोन दिवसांनी सुरू होतो. प्रामाणिकपणाचे हे फळ? आणि गुंडगिरी केली की 'गतिमान महाराष्ट्र'?

या आरोपींना आणि सजा झालेल्या गुंडांना पालिका रुग्णालयांतून खाजगी रुग्णालयात दाखल केले जाते. याचा अर्थ पालिका रुग्णालयांचे उपचार बेकार आहेत आणि सरकारी रुग्णालये आणि पालिका रुग्णालयांत उपचार घेणे धोक्याचे आहे. मग पालिकेने आणि सरकारने ही बाब जाहीर करावी. म्हणजे ज्याप्रमाणे या गुंडापुंडांवर खाजगी रुग्णालयात सरकारी पैशाने उपचार होतात, त्याप्रमाणे गरिबांनाही खाजगी रुग्णालयात सरकारी पैशाने उपचार मिळतील. पण सरकारी आणि पालिका रुग्णालये बेकार नाहीत, तिथे चांगले उपचार होतात तर गुन्हेगारांना खाजगी रुग्णालयात सरकारी खर्चाने उपचार देणे ताबडतोब बंद झाले पाहिजे. या गुन्हेगाराला एखादा असा आजार झाला असेल, ज्यावर पालिका वा सरकारी रुग्णालयात उपचार होत नसतील तर या गुन्हेगाराला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी पालिका रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याच्या प्रकृतीचा अहवाल जाहीर करावा. या अहवालाची त्रिसदस्य समितीने तपासणी केली पाहिजे. या तपासणीत अहवाल खोटा निघाला तर त्या डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन ताबडतोब रद्द करायला हवे. जर अहवाल सत्य निघाला आणि त्याला खाजगी रुग्णालयात दाखल केले तर त्या खाजगी रुग्णालयानेही रोज गुन्हेगाराचा वैद्यकीय अहवाल जाहीर करावा. तिथेही त्रिसदस्य समितीने रोज तपासणी करावी आणि जर खाजगी रुग्णालयाने खोटा अहवाल दिला तर रुग्णालयावर कडक कारवाई व्हावी.



चोरी उघड होत नाही तोपर्यंत या श्रीमंतांवर सरकारी पुरस्कारांची आणि सत्कारांची खैरात करायची आणि चोरी उघड झाल्यावर त्यांची खाजगी रुग्णालयात बडदास्त ठेवायची हा न्याय नाही, ही नाचक्की आहे.